सहायक मर्यादित (विभागीय) स्पर्धा परीक्षा - 2015
31 जानेवारी 2016

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET No.

2016

Code : **H07**

**A**

# प्रश्नपुस्तिका

**पेपर II**

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग/मंत्रालय येथे चालणाऱ्या कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पद्धती

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. आणि तसेच इतर काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक
केंद्राची संकेताक्षरे
शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **मंत्रालयातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग "अ" आणि विभाग "ब" सोडविणे आवश्यक आहे. आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग "अ" आणि विभाग "क" सोडविणे आवश्यक आहे.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृति करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनाधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पानावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

## विभाग अ

**1.** मूलभूत हक्कांच्या संदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

अ. राज्यघटनेने प्रदान केलेले हक्क राज्यास हिरावून घेता येत नाहीत.

ब. मूलभूत हक्कांचा संकोच करणारा कायदा फक्त संसदच करु शकेल.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त ?

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) दोन्हीही (4) दोन्ही नाहीत

---

**2.** खालील जोड्या जुळवा :

| | *अ* | | *ब* |
|---|---|---|---|
| अ. | स्वातंत्र्याचा हक्क | I. | अनुच्छेद 14 ते 18 |
| ब. | धर्मस्वातंत्र्याचा हक्क | II. | अनुच्छेद 19 ते 22 |
| क. | समानतेचा हक्क | III. | अनुच्छेद 25 ते 28 |
| ड. | शोषणाविरुद्धचा हक्क | IV. | अनुच्छेद 23 ते 24 |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | IV | I | III |
| (2) | II | III | I | IV |
| (3) | II | III | IV | I |
| (4) | IV | III | I | II |

---

**3.** राज्यघटनेतील तरतुदीनुसार

अ. माणसांच्या वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे.

ब. सार्वजनिक प्रयोजनाकरता सेवा करायाला शासन सक्ती करु शकते.

(1) फक्त विधान अ बरोबर आहे (2) फक्त विधान ब बरोबर आहे

(3) दोन्हीही विधाने बरोबर आहेत (4) दोन्हीही विधाने चुकीची आहेत

---

**4.** संविधानातील कोणत्या अनुच्छेदानुसार शासन स्त्रिया व बालके यांच्यासाठी विशेष तरतुदी करु शकते ?

(1) अनुच्छेद 14 (2) अनुच्छेद 15(2)

(3) अनुच्छेद 15(3) (4) अनुच्छेद 16

---

**5.** राज्याकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्यनिधीमधून सहाय्य मिळणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास फक्त धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

वरील वाक्य पुढील कोणत्या पर्यायाशी संबंधित आहे ?

(1) अनुच्छेद 31 (2) अनुच्छेद 30

(3) अनुच्छेद 29 (4) अनुच्छेद 28

6. भारताच्या संविधानानुसार खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) संविधान अमलात आल्यानंतर 10 वर्षांनी अस्पृश्यता पाळणे हा शिक्षापात्र गंभीर गुन्हा ठरविण्यात आला.

(2) संविधान अमलात आल्यापासून अस्पृश्यता पाळणे हा नुकसान भरपाई देऊन तडजोड करण्यायोग्य गुन्हा ठरविण्यात आला आहे.

(3) अस्पृश्यतेचे आचरण योग्य ठरविण्याचा कायदा करण्याचे अधिकार राज्य शासनाकडे सोपविण्यात आले आहेत.

(4) वरील एकही नाही.

---

7. "समानता, स्वातंत्र्य व बंधुता हे भारतीय नागरिकाचे मूलभूत अधिकार आहेत." या वाक्याबद्दल खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

(1) हे वाक्य पूर्णतः बरोबर आहे.
(2) हे वाक्य पूर्णतः चूक आहे.
(3) हे वाक्य अंशतः बरोबर आहे.
(4) वरीलपैकी कोणतेही नाही.

---

8. न्याय यंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून वेगळी ठेवण्याची तरतुद कशाद्वारे करण्यात आली आहे ?

(1) मूलभूत हक्क
(2) न्यायाधिकरणे
(3) राज्य धोरणाची निदेशक तत्त्वे
(4) मूलभूत कर्तव्य

---

9. राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे अनुच्छेद 51 नुसार राज्य ____________ प्रयत्नशील राहील.

(1) समान कामासाठी समान वेतनासाठी

(2) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करण्यासाठी

(3) पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणेसाठी

(4) वरील सर्व बरोबर आहे

---

10. घटनेतील कोणत्या अनुच्छेदानुसार अस्पृश्यतेचे कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिद्ध करण्यात आले आहे ?

(1) अनुच्छेद 14
(2) अनुच्छेद 15
(3) अनुच्छेद 16
(4) अनुच्छेद 17

---

11. राज्य शासनाची निदेशक तत्त्वे यांमधील अनुच्छेद ____________ नुसार कृषि व पशुसंवर्धन यांची सुसूत्र व्यवस्था लावणे त्यांच्या कत्तलीस मनाई करणे यांकरता उपाययोजना केल्या जातात.

(1) अनुच्छेद 44
(2) अनुच्छेद 48
(3) अनुच्छेद 47
(4) अनुच्छेद 46

---

12. 'राज्य' या व्याख्येत खालीलपैकी कोणत्या बाबींचा समावेश होतो ?

अ. केंद्र शासन व राज्य शासन

ब. संसद व विधानमंडळे

क. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ

ड. केंद्र शासनाच्या नियंत्रणाखालील स्थानिक प्राधिकरणे

(1) फक्त अ व ब येथील (2) फक्त अ येथील

(3) अ, ब, क व ड येथील (4) फक्त अ, ब व ड येथील

---

13. राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही लाभाचे पद किंवा विश्वासाचे पद धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस परकीय देशाकडून भेट स्वीकारण्यासांठी कोणाच्या परवानगीची गरज असते ?

(1) पंतप्रधान (2) सर्वोच्च न्यायालयाचे मुख्यन्यायाधीश

(3) राष्ट्रपती (4) वरीलपैकी कुठलेही नाही

---

14. अ. अनुच्छेद 51 नुसार राज्याच्या लोकसेवांमध्ये न्याययंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून अलग ठेवणे.

ब. अनुच्छेद 49 नुसार राष्ट्रीय महत्त्वाची स्मारके व स्थाने आणि वस्तू यांचे संरक्षण करणे.

वरील वाक्यांसाठी खालील पर्याय निवडा :

(1) वरील दोन्ही वाक्ये बरोबर आहेत

(2) वरील फक्त अ वाक्य बरोबर आहे

(3) वरील दोन्ही वाक्ये चूक आहेत

(4) वरील फक्त ब वाक्य बरोबर आहे

---

15. खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

अ. एका अपराधास एकच वेळ शिक्षा देता येते.

ब. न्यायालयाला आवश्यक वाटले तर एका अपराधाबद्दल एकदा दिलेल्या शिक्षेत वाढ करता येते.

क. वेगवेगळ्या उच्च न्यायालयात एकाच प्रकरणाबद्दल स्वतंत्र खटले चालविता येतात.

ड. न्यायालयाच्या परवानगीने कुणावरही स्वतःविरुद्ध साक्षीदार होण्याची सक्ती करता येते.

(1) फक्त अ येथील (2) फक्त अ व ड येथील

(3) सर्व विधाने बरोबर (4) सर्व विधाने चूक

**16.** मूलभूत हक्कांच्या संबंधाने खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

अ. संविधानाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले नियम, मूलभूत हक्कांशी विसंगत असतील तेथवर निष्प्रभ ठरतील.

ब. संविधानाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या रुढी, मूलभूत हक्कांशी विसंगत असतील तेथवर निष्प्रभ ठरतील.

(1) अ बरोबर
(2) ब बरोबर
(3) अ व ब दोन्ही चूक
(4) अ व ब दोन्ही बरोबर

---

**17.** राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे अनुच्छेद __________ नुसार राज्य हे, ग्रामपंचायती संघटित करण्यासाठी उपाययोजना करील व त्यांना स्वराज्याचे मूळ घटक म्हणून कार्य करण्यास समर्थ करण्यासाठी आवश्यक असतील असे अधिकार व प्राधिकार बहाल करील.

(1) अनुच्छेद 41
(2) अनुच्छेद 41 क
(3) अनुच्छेद 40
(4) अनुच्छेद 40 क

---

**18.** खालील वाक्य पूर्ण करा.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य काढून घेण्याचा कायदा __________ .

(1) संसदेच्या संमतीशिवाय करता येणार नाही
(2) राज्य शासनास राज्यपालांच्या मान्यतेने करता येईल
(3) 2/3 बहुमताने करता येईल
(4) वरीलपैकी कुठलेही नाही

---

**19.** 6 ते 14 वर्षेवयांच्या मुलांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाबाबत करण्यात आलेल्या तरतुदी घटनेतील कोणत्या कलमाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या आहेत ?

(1) अनुच्छेद 20 (क)
(2) अनुच्छेद 21 (क)
(3) अनुच्छेद 22 (क)
(4) अनुच्छेद 23 (क)

---

**20.** संविधानातील तरतुदीनुसार

अ. नागरिकांसाठी एकरूप नागरी संहिता लाभावी यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.

ब. सद्य:स्थितीत सर्वांसाठी एकरूप नागरीसंहिता नाही त्यामुळे तिच्या अंमलबजावणीसाठी नागरिक न्यायालयाचा दाद मागू शकतात.

(1) विधान अ व ब दोन्ही बरोबर असून अ हे ब चे कारण आहे
(2) विधान अ व ब दोन्ही बरोबर आहेत मात्र अ हे ब चे कारण नाही
(3) विधान अ बरोबर असून विधान ब चूकीचे आहे
(4) दोन्हीही विधाने चूकीची आहेत

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

21. कोणत्याही नागरिकाला खालीलपैकी कोठे प्रवेश करता येतो ?

अ. दुकाने आणि हॉटेल

ब. संसदेचे सभागृह

क. विधानमंडळाचे सभागृह

ड. सार्वजनिक करमणूकीची स्थाने

(1) ब, क व ड या ठिकाणी (2) ब व क या ठिकाणी

(3) अ व ड या ठिकाणी (4) वरील सर्व ठिकाणी

22. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीस किती तासामध्ये दंडाधिकाऱ्यापुढे हजर करणे आवश्यक असते ?

(1) दोन (2) दहा

(3) बारा (4) चोवीस

23. अनुच्छेद 24 नुसार

(1) माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई

(2) कारखाने वा खाण इ. मध्ये 14 वर्षांखालील बालकांना कामाला ठेवण्यास मनाई

(3) धर्मविषयक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य

(4) सद्सद्विवेकबुद्धिचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण आचरण व प्रचार

24. राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे न पाळल्यास

(1) संविधानाचा अवमान कायद्याखाली कारवाई करता येते

(2) न्यायालयाचा अवमान कायद्याखाली कारवाई करता येते

(3) न्यायालय केंद्र शासनास निर्देश देईल

(4) वरीलपैकी कुठलेही नाही

25. गाई व वासरे आणि दुभती जनावरे यांच्या कत्तलीस मनाई करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्याची तरतुद संविधानाच्या कोणत्या भागात करण्यात आली आहे ?

(1) मूलभूत हक्क

(2) मूलभूत कर्त्तव्ये

(3) राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्त्वे

(4) वरीलपैकी कुठलेही नाही

**26.** म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 हे नियम भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदाच्या परंतुकाद्वारे तयार करण्यात आले आहेत ?

(1) अनुच्छेद 301 (2) अनुच्छेद 302

(3) अनुच्छेद 305 (4) अनुच्छेद 309

---

**27.** "शासकीय कर्मचारी" या व्याख्ये मध्ये पुढीलपैकी कोणाचा समावेश करण्यात येतो ?

अ. राज्याच्या कामकाजासंबंधातील कोणत्याही पदावर नियुक्त व्यक्ती.

ब. महामंडळाकडे कार्यरत व्यक्ती.

क. स्थानिक प्राधिकरणाकडे काम करणारी व्यक्ती, ज्यांचे वेतन राज्याच्या एकत्रितकृत निधीव्यतिरिक्त अन्य मार्गाने काढले जाते.

(1) फक्त अ (2) फक्त क

(3) अ, ब व क (4) फक्त अ व ब

---

**28.** शासन नियमाप्रमाणे

अ. शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या शरीरावर निवडणूक चिन्ह लावणे म्हणजे निवडणूकीत आपले वजन खर्च केले असे ठरेल.

ब. निवडणूकीसाठी उमेदवाराचे नाव सुचवणे म्हणजे निवडणूकीत भाग घेणेच होय.

(1) दोन्ही योग्य (2) दोन्ही अयोग्य

(3) फक्त ब योग्य (4) फक्त अ योग्य

---

**29.** कोणताही पक्ष राजकीय आहे किंवा कसे/कोणतीही संघटना राजकारणात भाग घेते किंवा कसे यावरील अंतिम निर्णय ?

(1) त्या संघटनेचा असेल (2) शासनाचा असेल

(3) संघटनेच्या अध्यक्षांचा असेल (4) वरील सर्व चूक आहे

---

**30.** श्री मनोज क.अ. यांचे काका विधानसभेच्या निवडणूकीस उभे आहेत. श्री मनोज कक्ष अधिकारी यांची खालील कोणती कृती योग्य ठरेल ?

(1) श्री मनोज विधानसभा निवडणूकीत त्यांच्या काकांचा प्रचार करतील.

(2) श्री मनोज मतदान व प्रचार करणार नाहीत.

(3) श्री मनोज मतदान करणार नाहीत परंतु प्रचार करतील.

(4) श्री मनोज मतदान करणार परंतु प्रचार करणार नाहीत.

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**31.** म.ना.से. (वर्तणूक), नियम 5 नुसार शासकीय कर्मचारी राजकारणामध्ये

अ. सहभागी होऊ शकतो आणि राजकीय संघटनेचा सदस्य होऊ शकतो.

ब. निवडणूकांच्या प्रचारामध्ये भाग घेवू शकतो.

क. राजकीय पक्षाला वर्गणी देऊ शकतो.

ड. मतदानाचा हक्क बजावू शकतो.

(1) फक्त ड (2) फक्त अ व ब

(3) फक्त क व ड (4) अ, ब, क व ड

---

**32.** खालील विधानांपैकी कोणते विधान सत्य आहे ?

अ. शासनाशी कार्यालयीन व्यवहार करणाऱ्या कंपनीमध्ये शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबून असलेल्या कोणत्याही व्यक्तीला नोकरी स्वीकारण्यापूर्वी शासनाची पूर्वमंजुरी घेणे आवश्यक आहे,

ब. पूर्वमंजुरी घेतली नसल्यास शासनाला कळविणे आवश्यक आहे.

क. तथापि कोणताही शासकीय कर्मचारी, कुटुंबातील व्यक्ती नोकरी किंवा भागीदारी असलेल्या कंपनीला तातडीच्या परिस्थितीत कंत्राट देऊ शकतो.

(1) फक्त अ सत्य (2) अ, ब व क सत्य

(3) फक्त अ व क सत्य (4) फक्त अ व ब सत्य

---

**33.** "देणगी" या संज्ञेमध्ये खालीलपैकी कोणत्या घटकांचा समावेश होतो ?

अ. विनामूल्य वाहतूक

ब. भोजन व निवासव्यवस्था

क. सामाजिक कारणाप्रित्यर्थ केलेला पाहुणचार

(1) फक्त ब (2) अ, ब व क

(3) फक्त अ व ब (4) यापैकी कोणतेही नाही

---

**34.** श्री भाऊसाहेब जाधव हे शासकीय कर्मचारी, यांनी स्वतःच्या मालकीचे वृत्तपत्र सुरू केले आहे ?
वरील वाक्यासाठी खालील पर्याय निवडा.

(1) हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे.

(2) वरील कार्य शासन नियमाविरुद्ध आहे.

(3) वृत्तपत्र चालवणे हा काही गुन्हा नाही.

(4) वरील तीन पर्यायापेक्षा वेगळा पर्याय आहे.

**35.** एखादा शासकीय कर्मचारी प्रकाशन प्रकाशकामार्फत प्रकाशित करत असेल आणि ते केवळ साहित्यिक, कलात्मक किंवा वैज्ञानिक स्वरूपाचे असेल तर.

(1) अशा कामकाजास शासनाच्या मंजुरीची गरज असेल.

(2) अशा कामकाजास शासनाच्या मंजुरीची गरज नसेल.

(3) असे कामकाज शासन नियमाविरुद्ध असल्याने शिस्तभंगविषयक कार्यवाही होऊ शकते.

(4) वरीलपेक्षा वेगळे उत्तर आहे.

---

**36.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, 1979 मधील नियम क्र. __________ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यास आकाशवाणी किंवा दूरदर्शन यांच्याशी संपर्क ठेवण्यास प्रतिबंध केलेला आहे.

(1) 9 (2) 12

(3) 7 (4) यापैकी कुठलेही नाही

---

**37.** श्रीमती प्रतिभा, कक्ष अधिकारी यांनी पुढाकार घेवून ध्वजनिधी म्हणून ₹ 50,000 चा निधी संकलित केला.

(1) त्यांनी केलेली कृती म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 नियमाचा भंग करणारी नाही

(2) त्यांची कृती म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 नियमाचा भंग करणारी आहे

(3) शासनाची कार्योत्तर मान्यता घ्यावी

(4) वरील (2) व (3) योग्य

---

**38.** म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 नुसार गट "ब" चे पद धारण करणारा शासकीय कर्मचारी विवाह, वर्षश्राद्ध, अंत्यसंस्कार किंवा वास्तुशांतीसाठी कितीपेक्षा जास्त मूल्य असलेली देणगी शासनास कळवेल ?

(1) ₹ 2,000 (2) ₹ 3,000

(3) ₹ 4,000 (4) ₹ 5,000

---

**39.** म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 नुसार खालील कोणती कृती योग्य आहे ?

अ. श्री पाटील, अवरसचिव हे शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय श्री कुलकर्णी, उपसचिव यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित केलेल्या खाजगी कार्यक्रमास उपस्थित राहिले.

ब. श्री मनीष, सहाय्यक पूर्वमान्यतेशिवाय सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाच्या कार्यक्रमास उपस्थित राहिले.

क. श्री कुलकर्णी उपसचिव यांच्या निरोप समारंभाकरिता वर्गणी वसूल करण्यात आली.

(1) फक्त अ (2) फक्त अ व ब

(3) अ, ब व क (4) सर्व अयोग्य

---

**40.** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 च्या नियम __________ अन्वये शासकीय कर्मचारी कोणत्याही रोख्यांमध्ये, शेअरमध्ये किंवा इतर गुंतवणुकीमध्ये पैसे गुंतविणार नाही.

(1) नियम 17 (2) नियम 7

(3) नियम 21 (4) नियम 24

---

**41.** कोणताही शासकीय कर्मचारी कोणत्याही व्यक्तीला व्याजाने/परतफेड पैशांमध्ये किंवा वस्तुरूपात करावी लागणार असेल अशा पद्धतीने पैसे उसने देणार नाही ?

(1) वरील नियम पूर्णतः चुकीचा आहे

(2) वरील नियम अंशतः चुकीचा आहे

(3) वरील नियम पूर्णतः बरोबर आहे

(4) वरीलपेक्षा वेगळे उत्तर आहे

---

**42.** धार्मिक सामाजिक रुढीला अनुसरुन शासकीय कर्मचाऱ्याला देणगी स्विकारायची असल्यास देणगीची मूल्य मर्यादाबाबत जोड्या लावा.

| *कर्मचाऱ्याचे पद* | | *देणगी मूल्य मर्यादा (₹)* | |
|---|---|---|---|
| अ. | अ | I. | 1,000 |
| ब. | ब | II. | 7,000 |
| क. | ड | III. | 2,000 |
| | | IV. | 4,000 |

| | अ | ब | क |
|---|---|---|---|
| (1) | II | IV | I |
| (2) | IV | III | I |
| (3) | II | IV | III |
| (4) | यापैकी नाही | | |

---

**43.** शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय श्री देशपांडे या शासकीय कर्मचाऱ्याविरुद्ध ज्याच्या कोणत्याही कार्यालयीन कृतीमुळे प्रतिकुल टीकेचा किंवा अब्रुनुकसानीच्या स्वरूपाच्या आरोपाचा विषय झाला आहे अशा कृतिच्या प्रतिसमर्थनार्थ न्यायालयाकडे ?

(1) दाद मागता येईल (2) दाद मागता येणार नाही

(3) दाद मागणे त्यांचा अधिकार आहे (4) वरील सर्व चूक आहे

---

**44.** कोणताही शासकीय कर्मचारी/अधिकारी

(1) एका वेळी एकपेक्षा अधिक विवाह करू शकतो

(2) प्रथम जीवनसाथी हयात असताना, दुसरा विवाह करू शकतो

(3) प्रथम जीवनसाथी हयात असताना, दुसऱ्याशी विवाहविषयक करार करू शकतो

(4) वरील सर्व चूक आहे

**45.** म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 नुसार योग्य कृती ठरवा.

अ. श्रीमती सुनंदा, अवरसचिव यांनी 15 वर्षाच्या राघवला घरकामासाठी ठेवले.

ब. श्री हेमंत, सहायक यांनी आपल्या लग्नात हुंडा घेतला नाही.

क. श्रीमती सुमनबाई, शिपाई यांनी आपल्या मुलाला लग्नात हुंडा घेण्यास भाग पाडले.

(1) फक्त अ
(2) फक्त ब
(3) फक्त अ व ब
(4) वरील सर्व

---

**46.** अ. शासकीय कर्मचारी सार्वजनिक ठिकाण वगळता मादक पेये सेवन करू शकतो.

ब. शासकीय कर्मचाऱ्यास कामावर असताना मादक पेये घेण्यास प्रतिबंध आहे.

(1) वरील ब येथील वाक्य बरोबर आहे
(2) वरील अ येथील वाक्य बरोबर आहे
(3) वरील दोन्ही वाक्ये बरोबर आहेत
(4) वरील दोन्ही वाक्ये चूकीची आहेत

---

**47.** म.ना.से. (वर्तणूक), नियम __________ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनेला मान्यता दिली जाते.

(1) 3
(2) 30
(3) 29
(4) 31

---

**48.** शासकीय कर्मचाऱ्यांच्या (औद्योगिकेतर) संघटनेच्या सदस्याची वर्गणी थकीत असेल, तर अशा सदस्यास किती कालावधीसाठी कोणताही लाभ मिळणार नाही ?

(1) वर्गणी थकीत असली तरी लाभ मिळतील
(2) थकबाकी चुकती करेपर्यंत
(3) सर्व थकबाकी चुकती करेपर्यंतचा काळ व त्यानंतरचा 1 महिन्याचा कालावधी जाईपर्यंत
(4) सर्व थकबाकी चुकती करेपर्यंतचा काळ व त्यानंतरचा दोन महिन्यांचा कालावधी जाईपर्यंत

---

**49.** शासकीय कर्मचारी संघटनेच्या (औद्योगिकेतर) हिताला बाधा ठरेल अशी कृती करणाऱ्या कोणत्याही पदाधिकाऱ्याला सर्वसाधारण सभेमध्ये किती सदस्यांच्या मताधिक्याने काढून टाकता येते ?

(1) 1/2
(2) 1/3
(3) 3/4
(4) 2/3

---

**50.** म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 हे __________ रोजी अंमलात आले आहेत.

(1) 30 जुलै
(2) 12 जुलै
(3) 30 जून
(4) 12 जून

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**51.** खालील विधानांचा विचार करा :

अ. शिकाऊ उमेदवारास प्रशिक्षण कालावधीत मासिक दराने रक्कम देण्यात येते.

ब. शिकाऊ उमेदवाराची नियुक्ती विभागाच्या संवर्गातील कायम रिक्त पदावर केली जाते.

आता सांगा की

(1) दोन्ही विधाने बरोबर असून दुसरे विधान पहिल्याचे स्पष्टीकरण आहे

(2) दोन्ही विधाने चुकीची आहेत

(3) दोन्ही विधाने बरोबर परंतु दुसरे विधान पहिल्या विधानाचे योग्य स्पष्टीकरण नाही

(4) पहिले विधान बरोबर परंतु दुसरे चुक

---

**52.** भारताचा किंवा राज्याचा एकत्रित निधी याचा खालीलप्रमाणे अर्थ होतो.

अ. भारत सरकारला प्राप्त झालेल्या महसूलाच्या सर्व रकमा.

ब. राजकोष पत्रांच्या विक्रीद्वारे उभारलेली सर्व कर्जे.

क. अर्थोपाय आगाऊ रकमा यांद्वारे आणि कर्जाच्या परतफेडीच्या रुपाने शासनाकडे जमा झालेला सर्व पैसा.

(1) वरील एकचे उत्तर बरोबर आहे
(2) वरील दोन येथील उत्तर बरोबर आहे
(3) वरील अ व क उत्तर बरोबर आहे
(4) वरील सर्व बरोबर आहे

---

**53.** रजेच्या कालावधीमध्ये परीक्षा घेण्यात आल्यास सदर कालावधी हा

(1) कर्तव्यार्थ कालावधी समजला जाईल
(2) रजेचा कालावधी समजण्यात येईल
(3) विनावेतन कालावधी समजण्यात येईल
(4) यापैकी कोणतेही नाही

---

**54.** लोकसेवेच्या कोणत्याही शाखेतील वरच्या पदास पात्र ठरण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्याला जी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते, तिला __________ म्हणतात आणि सदर परीक्षेसाठी ____________ पेक्षा अधिक वेळा बसण्याची सवलत देण्यात येवू नये.

(1) सक्तीची विभागीय परीक्षा, दोन
(2) लोकसेवा आयोग परीक्षा, एक
(3) गुणवत्ता चाचणी, दोन
(4) विभागीय परीक्षा, एक

---

**55.** "वित्तलब्धी" या संज्ञेत पुढीलपैकी कोणत्या बाबींचा समावेश होतो ?

अ. वेतन

ब. निवृत्तीवेतन

क. निर्वाह भत्त्याची रक्कम (निलंबनाधीन असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याच्या बाबत)

ड. कुटुंब निवृत्ती वेतन

(1) फक्त अ
(2) वरील सर्व
(3) फक्त अ, ब व क
(4) फक्त अ व ब

---

**56.** खालील विधानांचा विचार करा :

अ. शासकीय कर्मचाऱ्यास राज्याच्या एकत्रित निधीव्यतिरिक्त प्राप्त झालेले आवर्ती प्रदान म्हणजे "फी" होय.

ब. शासकीय कर्मचाऱ्यास साहित्यिक किंवा कलात्मक उपक्रमापासून मिळालेल्या उत्पन्नाचा समावेश "फी" मध्ये होत नाही.

आता सांगा की

(1) दोन्ही विधाने बरोबर

(2) फक्त पहिले विधान बरोबर

(3) फक्त दुसरे विधान बरोबर

(4) दोन्ही विधाने चूक

---

**57.** ज्या सेवेतील शासकीय कर्मचाऱ्याला भारताच्या किंवा राज्याच्या किंवा संघ राज्यक्षेत्राच्या एकत्रित निधीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही उत्पन्नाच्या साधनातून शासनाच्या मंजूरीने वेतन मिळते अशा सेवेला __________ म्हणतात.

(1) स्वीयेतर सेवा
(2) परकीय सेवा
(3) नियुक्त सेवा
(4) यापैकी नाही

---

**58.** धारणाधिकार म्हणजे

अ. सावधि-नियुक्तीपदासह ज्या स्थायी पदावर शासकीय कर्मचाऱ्याची कायमपणे नियुक्ती केलेली असेल असे स्थायी पद कायम धारण करण्याचा हक्क.

ब. असा हक्क तात्काळ निर्माण होवो किंवा त्या पदावरील अनुपस्थितीचा एक किंवा त्याहून अधिक कालावधी संपल्यावर निर्माण होणे.

(1) वरील सर्व चूक आहे
(2) वरील सर्व बरोबर आहे
(3) वरील फक्त अ बरोबर आहे
(4) वरील फक्त ब बरोबर आहे

---

**59.** नक्षलग्रस्त भागातील शासकीय कर्मचाऱ्यांना कोणता भत्ता अनुज्ञेय असतो ?

(1) विशेष भत्ता
(2) धुलाई भत्ता
(3) प्रवास भत्ता
(4) स्थानिक भत्ता

---

**60.** प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याने त्याची स्थायी पदावर कायमपणे नियुक्ती होण्यापूर्वी किंवा नियुक्तीच्या तारखेपासून 6 महिन्यांची सेवा पूर्ण होण्यापूर्वी ____________ दाखल केले पाहिजे.

(1) शालेय प्रमाणपत्र
(2) चारित्र्य प्रमाणपत्र
(3) कुटुंब प्रमाणपत्र
(4) वरील एकही नाही

---

61. खालील विधानांचा विचार करा :

अ. शासकीय कर्मचाऱ्याची वैद्यकीय दृष्ट्या पात्र प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात घेतली नाही.

ब. वैद्यकीय प्रमाणपत्र हे त्याच्या इतर सेवाविषयक कागदपत्रांबरोबर सुरक्षित ठेवले पाहिजे.

(1) पहिले विधान बरोबर असून दुसरे विधान त्याचे स्पष्टीकरण आहे

(2) पहिले विधान चूक आहे

(3) दुसरे विधान चूक आहे

(4) दोन्ही विधाने बरोबर आहेत

---

62. आरोग्यविषयक वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करण्यापासून ____________ यांना सूट दिली जाते.

(1) शारीरिक अपंगत्व असलेल्यांना

(2) नवनियुक्ती असलेल्या सुदृढ तरुणांना/तरुणींना

(3) सेवानिवृत्तीच्या तारखेनंतर 6 महिन्यांच्या आत पुनर्नियुक्त केलेल्या सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्याला

(4) शारीरिकदृष्ट्या सक्षम असलेल्या उमेदवारांना

---

63. शासकीय सेवेत सहा महिन्यांची तात्पुरती सेवा पूर्ण केल्यानंतर ज्या व्यक्तीला नियम 15(1) मधील वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करण्यापूर्वी कार्यमुक्त केले असेल

अ. अशा व्यक्तीची वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय फेरनेमणूक करता येत नाही.

ब. अशा व्यक्तीचे वैद्यकीय प्रमाणपत्र फेरनेमणूकीनंतर घेता येते.

(1) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत

(2) फक्त पहिले वाक्य बरोबर आहे

(3) फक्त दुसरे वाक्य बरोबर आहे

(4) दोन्ही वाक्ये चूक आहेत

---

64. कमी वेतन असलेल्या पदावरील बदली केव्हा अनुज्ञेय असते ?

अ. अकार्यक्षमता किंवा गैरवर्तणूक

ब. लेखी विनंती केल्यास

क. धारणाधिकार असलेले पद नष्ट होण्याची शक्यता नसल्यास

(1) फक्त अ व ब (2) फक्त अ व क

(3) फक्त ब (4) फक्त अ

65. शासकीय कर्मचारी किती तासांसाठी शासनाच्या सेवेस बांधील असतो ?

(1) सकाळी 9.45 ते 5.30
(2) बारा तास
(3) सुट्टया सोडून सर्व दिवस
(4) संपूर्ण वेळ

66. राजपत्रित शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवाभिलेख कोण सुस्थितीत ठेवील ?

(1) कार्यासन अधिकारी
(2) रोख शाखा प्रमुख
(3) विभागप्रमुख
(4) लेखापरीक्षा अधिकारी

67. शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील नोंदी योग्य करून त्या साक्षांकित केल्या आहेत हे पाहण्याचे कर्तव्य कोणाचे असते ?

(1) सामान्य प्रशासन विभाग
(2) कार्यालय प्रमुख
(3) कार्यासन अधिकारी
(4) यापैकी कुठलेही नाही

68. योग्य विधान ओळखा.

अ. श्री दिनकर हे दि. 02/05/88 रोजी शासनसेवेत लागले. त्यानंतर दोनवर्षानी त्यांनी जन्मतारखेत बदल करण्यासाठी अर्ज केला. त्यांच्या अर्जावर विचार केला जाईल.

ब. श्री पाटील हे दि. 01/04/90 रोजी शासनसेवेत लागले त्यांनी दि. 25/06/97 रोजी जन्मतारखेत बदल करण्यासाठी अर्ज केला. त्यांच्या अर्जावर विचार केला जाईल.

(1) दोन्ही योग्य
(2) दोन्ही अयोग्य
(3) फक्त अ योग्य
(4) फक्त ब योग्य

69. शासकीय कर्मचाऱ्याच्या जन्माचे वर्ष व महिना माहीत असून जन्मदिनांक माहीत नसल्यास कोणता दिनांक गृहित धरावा ?

(1) 1
(2) 10
(3) 15
(4) 16

70. शासकीय कर्मचाऱ्याच्या बदलीनंतर त्याच्या सेवापुस्तकाबाबत खालीलपैकी कोणता पर्याय ***अचूक*** आहे ?

(1) सेवापुस्तकाची एक प्रत त्याच्या मूळ कार्यालयात ठेवली जाईल
(2) सेवापुस्तकाची मूळ प्रत मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागाकडे ठेवण्यात येईल
(3) सेवापुस्तकाची मूळ प्रत बदलीनंतरच्या कार्यालयाच्या अभिरक्षेत असेल
(4) सेवापुस्तक त्याच्या स्वतःच्या ताब्यात

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

71. शासकीय कर्मचाऱ्यांना सेवापुस्तके कधी दाखविली पाहिजे ?

(1) दरवर्षी

(2) फक्त बदली झाली असेल तेव्हा

(3) पदोन्नतीच्या वेळेस

(4) सेवापुस्तके दाखविण्याची गरज नाही

---

72. म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियमानुसार प्रत्येक कार्यालयप्रमुखाने त्याच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील शासकीय कर्मचाऱ्यांना मागील वित्तीय वर्षात सेवापुस्तके दाखवून त्यांनी तपासली असल्याची कार्यवाही केल्याचे प्रमाणपत्र दरवर्षी कोणत्या महिन्याच्या अखेरीस वरिष्ठ अधिकाऱ्यास सादर केले पाहिजे ?

(1) मार्च (2) जानेवारी

(3) जुलै (4) सप्टेंबर

---

73. प्रवास खर्चात पुढीलपैकी कशाचा समावेश होतो ?

अ. वैयक्तिक सामानासह केलेला प्रवासाचा खर्च

ब. टोल नाक्यावर दिलेला कर

क. अल्पोहाराचा खर्च

ड. काचसामानाची फूट तूट

(1) फक्त अ (2) फक्त अ व ब

(3) अ, ब, क व ड (4) फक्त अ व ड

---

74. दरवर्षी कोणत्या महिन्यात सेवापुस्तकांची व सेवापटाची पडताळणी कार्यालय प्रमुखाने केली पाहिजे ?

(1) जानेवारी (2) मार्च

(3) मे (4) डिसेंबर

---

75. कर्तव्यामध्ये पुढील बाबी समाविष्ट असतात.

अ. परिवीक्षाधीन म्हणून केलेली सेवा

ब. पदग्रहण अवधि

क. शासनाच्या आदेशाद्वारे किंवा त्या अन्वये प्राधिकृत केलेला निदेशन पाठ्यक्रम

(1) वरील सर्व चूक आहे (2) वरील सर्व बरोबर आहे

(3) वरील फक्त एक बरोबर आहे (4) वरील दोन व तीन बरोबर आहे

## विभाग ब

**76.** 'तातडीचे' प्राथम्यक्रम चिन्हांकित प्रकरणे किती दिवसाच्या आत प्रस्तुत करणे आवश्यक असते ?

(1) त्याच दिवशी
(2) दोन दिवसांच्या आत
(3) एका आठवड्याच्या आत
(4) वरील एकही नाही

---

**77.** खालीलपत्रांपैकी कोणत्या आवकपत्रांची दैनंदिनीमध्ये नोंद करणे आवश्यक आहे ?

(1) अनौपचारिक संदर्भ
(2) मंत्र्याकडून आलेली कार्यवृत्ते
(3) कार्यवाहीसाठी फाईलमधून ठेवून घेतलेल्या टिप्पणीची प्रत
(4) वरील सर्व

---

**78.** ***अयोग्य*** जोडी ओळखा.

(1) अ वर्गातील नस्ती – कायमस्वरूपी जतन
(2) ब वर्गातील नस्ती – 50 वर्षासाठी जतन
(3) क वर्गातील नस्ती – 5 वर्षासाठी जतन
(4) ड वर्गातील नस्ती – 1 वर्षासाठी जतन

---

**79.** मंत्रालय अभिलेख कार्यालयाकडून फाईल प्राप्त करण्यासाठी कोणत्या नमुन्यातील मागणीचिठ्ठीचा वापर केला जातो ?

(1) परिशिष्ट-11
(2) परिशिष्ट-19
(3) परिशिष्ट-26
(4) परिशिष्ट-9

---

**80.** महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीची कोणत्या तारखेपासून राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे ?

(1) 1 मे 1961
(2) 1 जुलै 1965
(3) 1 जुलै 1975
(4) 1 मे 1971

---

81. विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना कार्यासनात ठेवण्यात येणाऱ्या विधानसभा/विधानपरिषद प्रश्नांच्या नोंदवहीचे परिनिरीक्षण कार्यासन अधिकाऱ्यांनी किमान कितीवेळा करावे ?

(1) दररोज एकदा (2) आठवड्यातून एकदा

(3) आठवड्यातून दोनवेळा (4) महिन्यातून एकदा

---

82. सर्वसाधारणपणे केंद्र शासनाशी पत्रव्यवहार करतांना तो कोणत्या दर्जाच्या अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीत करण्यात येतो ?

(1) अवरसचिव

(2) उपसचिव किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाचा अधिकारी

(3) कार्यासन अधिकारी

(4) यापैकी नाही

---

83. निकडीच्या स्वरूपाच्या अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या कोणत्या राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात येतात ?

(1) साधारण (2) असाधारण

(3) लोकराज्य (4) प्रसिद्धीपत्रक

---

84. बिनसरकारी व्यक्तीला किंवा संस्थेला उद्देशून लिहिलेल्या पत्रात पत्रे पाठविणाऱ्याचा कोणता तपशील असणे आवश्यक आहे ?

(1) फक्त पदनाम

(2) अधिकाऱ्याचे नाव व पदनाम

(3) अधिकाचाचे नाव, पदनाम व विभागाचे नाव

(4) वरील सर्व

---

85. खालीलपैकी ***चुकीचे*** विधान कोणते ?

(1) तात्काळ प्रकरणे त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी सकाळी सादर करावीत.

(2) तातडीची प्रकरणे चार दिवसात सादर करावीत.

(3) सर्व साधारण प्रकरणे एका महिन्यात सादर करावीत.

(4) चर्चेसाठीच्या प्रकरणांवर त्याच दिवशी कार्यवाही करावी.

86. महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तीना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्यासाठी कोणता कायदा करण्यात आला ?

(1) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2012

(2) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2013

(3) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015

(4) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2014

---

87. 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान' मध्ये खालीलपैकी कोणत्या घटकाचा समावेश ***नाही*** ?

(1) घनकचरा व्यवस्थापन (2) वैयक्तिक शौचालय

(3) सामुदायिक शौचालय (4) पिण्याचे स्वच्छ पाणी

---

88. पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना केव्हापासून सुरु झाली ?

(1) सन 2011 – 12 (2) सन 2010 – 11

(3) सन 2012 – 13 (4) सन 2013 – 14

---

89. गट 'अ' व गट 'ब' मधील पदांवर पदोन्नतीने/सरळसेवेने नियुक्ती करताना खालीलपैकी कोणत्या अधिकाऱ्यांना त्यांच्या सोईचा महसुली विभाग वाटप करता येईल ?

(1) सेवानिवृत्तीस तीन वर्षे किंवा त्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे असे अधिकारी

(2) अपंग, विधवा, परित्यक्त्या

(3) जोडीदार किंवा मूल मतीमंद आहे

(4) वरील सर्व

---

90. एखाद्या तारांकित प्रश्नाचे उत्तर विधान परिषदेत देण्यापूर्वी ते कोठे प्रसिद्ध केले जाते ?

(1) विधान सभेत (2) राजपत्रात

(3) प्रसार माध्यमे (4) यापैकी नाही

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

91. विधानसभा सदस्यांना ज्यावेळी त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला सभागृहात तोंडी उत्तर मिळावे अशी इच्छा असते अशा प्रश्नांना कोणते प्रश्न म्हणतात ?

(1) लक्षवेधी प्रश्न (2) कपात सुचना प्रश्न

(3) अतारांकित प्रश्न (4) तारांकित प्रश्न

---

92. विधानसभा सदस्यांना सभागृहात अल्पावधी सुचना प्रश्न उपस्थित करावयाचा असेल तर त्याबाबतची सुचना विधानमंडळ सचिवास अधिवेशन सुरु होण्याच्या किती दिवस अगोदरची नसावी ?

(1) 2 दिवस (2) 1 दिवस

(3) 7 दिवस (4) 5 दिवस.

---

93. विधानसभा सभागृहात एखाद्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आल्यावर विधानसभा सदस्यांना ज्या बाबींसंबंधी उत्तर देण्यात आले असेल अशी कोणतीही बाब आणखी स्पष्ट करण्याच्या कारणासाठी विचारण्यात आलेला प्रश्न म्हणजे काय ?

(1) अल्पसुचना प्रश्न (2) पुरवणी प्रश्न

(3) जोड प्रश्न (4) विस्तृत प्रश्न

---

94. एखाद्या प्रश्नाचे उत्तर विधानपरिषदेत दिले जाण्यापूर्वी कुणाची परवानगी आवश्यक असते ?

(1) विधानमंडळ सचिव (2) सभापती

(3) मुख्यमंत्री (4) संसदीय कार्यमंत्री

---

95. विधानपरिषदेच्या बैठकीच्या शेवटी पुरेशा सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा करण्यासाठी सभापती कोणकोणत्या दिवशी अर्धा तास चर्चा नेमून देतात ?

(1) सोमवार, मंगळवार, बुधवार, शुक्रवार

(2) सोमवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार

(3) सोमवार, बुधवार, शुक्रवार

(4) सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार

**96.** अनुच्छेद ____________ नुसार राज्यपाल, विधान सभा व विधान परिषदेस उद्देशून भाषण करतात.

(1) 177 (2) 175

(3) 178 (4) 179

---

**97.** अनुच्छेद 157 – कोणतीही व्यक्ती, ती भारतीय नागरिक आणि वयाची ____________ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय राज्यपालपदावर नियुक्तीस पात्र असणार नाही.

(1) 21 (2) 25

(3) 30 (4) 35

---

**98.** राज्यपालांच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान ***चुकीचे*** आहे ?

(1) राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत पंद धारण करता येते.

(2) राज्यपालाची नियुक्ती मुख्यमंत्री यांच्या सल्ल्याने पंतप्रधान करतात.

(3) कोणतेही लाभाचे अन्य पद धारण करता येत नाही.

(4) वरील एकही नाही.

---

**99.** विधान परिषदेमध्ये खालील मार्गांद्वारे पण सदस्य निवडून येतात. त्यांचे प्रमाण अनुक्रमे खाली दिलेल्या पर्यायामधून निवडा.

पदवीधर — शिक्षक — राज्यपाल नामनिर्देशित

(1) $\frac{1}{3}, \frac{1}{6}, \frac{1}{12}$ (2) $\frac{1}{12}, \frac{1}{12}, \frac{1}{6}$

(3) $\frac{1}{3}, \frac{1}{3}, \frac{1}{3}$ (4) $\frac{1}{12}, \frac{1}{12}, \frac{1}{12}$

---

**100.** मंत्रिपरिषद सामुदायिकपणे ____________ जबाबदार असते.

(1) राज्य विधानसभेस (2) राज्य विधान परिषदेस

(3) राज्य विधान सभा व परिषदेस (4) मुख्यमंत्र्यास

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

## विभाग क

**76.** राज्य लोकसेवा आयोगाने केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल विधीमंडळासमोर ठेवण्याची व्यवस्था खालीलपैकी कोण करतो ?

(1) आयोगाचे अध्यक्ष
(2) मा. राज्यपाल
(3) मुख्यमंत्री
(4) विधानसभा अध्यक्ष

---

**77.** राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष किंवा सदस्य यांना पदावरून दूर करताना मा. राष्ट्रपतींना प्रस्ताव खालीलपैकी कोणाकडे चौकशीसाठी पाठवावा लागतो ?

(1) राज्याचे उच्च न्यायालय
(2) सर्वोच्च न्यायालय
(3) राज्याचे विधानमंडळ
(4) राज्याचे महाअधिवक्ता

---

**78.** लोकसेवा आयोगाच्या सदस्यांपैकी किमान किती सदस्य शासकीय सेवेतील असणे आवश्यक आहे ?

(1) 15%
(2) 50%
(3) 60%
(4) 70%

---

**79.** राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष वयाची किती वर्षे पूर्ण होई पर्यंत आपल्या पदावर राहू शकतो ?

(1) 65 वर्षे
(2) 60 वर्षे
(3) 62 वर्षे
(4) यापैकी नाही

---

**80.** राज्य लोकसेवा आयोगाकडे स्थानिक प्राधिकरणाच्या सेवांबाबतची अतिरिक्त कार्ये संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदाद्वारे सोपविण्यात येतात ?

(1) अनुच्छेद 320
(2) अनुच्छेद 321
(3) अनुच्छेद 322
(4) वरीलपैकी एकही नाही

---

**81.** सरळ सेवा भरतीसाठी आयोगाने दिनांक 27 नोव्हेंबर, 2015 रोजी जाहिरात प्रसिद्ध केली. जाहिरातीतील कमाल वयोमर्यादा 33 वर्षे नमुद केली आहे. सदर वयोमर्यादेची गणना कोणत्या दिनांकास केली जाईल ?

(1) 27 नोव्हेंबर, 2015
(2) 1 डिसेंबर, 2015
(3) 1 मार्च, 2016
(4) 1 जानेवारी, 2016

**82.** आयोगाच्या 'सेवा प्रवेश नियम व चौकशी' विभागात खालीलपैकी कोणते प्रस्ताव तपासले जात नाहीत ?

(1) पदोन्नती व निवडसूची

(2) बदलीने नियुक्ती

(3) बी.एम.सी. व बी.ई.एस.टी. मधील विभागीय चौकशी

(4) इजा निवृत्ती वेतन

**83.** महिला आरक्षणाबाबत खालीलपैकी कोणते विधान *असत्य* आहे ?

(1) महिलांसाठी 30% आरक्षण आहे.

(2) ते समांतर आरक्षण आहे.

(3) महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या पदांचा अनुशेष पुढे ओढण्यात येतो.

(4) महिला आरक्षण खुल्या प्रवर्गातील महिलांना देखील लागू आहे.

**84.** पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता घेण्यात येणाऱ्या शारीरिक चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी किमान किती टक्के गुण मिळविणे आवश्यक आहे ?

(1) 50 टक्के (2) 40 टक्के

(3) 20 टक्के (4) 75 टक्के

**85.** सरळ सेवा भरतीसाठी घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षांचे निकाल कोणत्या कक्षाद्वारे जाहीर करण्यात येतात ?

(1) कक्ष-13 ब (2) कक्ष-9

(3) कक्ष-14 ब (4) कक्ष-13 अ

**86.** उन्नत व प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याबाबत देण्यात येणाऱ्या नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी खालीलपैकी कोणत्या शासन परिपत्रकाद्वारे विहित करण्यात आला आहे ?

(1) शासन परिपत्रक, दिनांक 17 ऑगस्ट, 2013

(2) शासन परिपत्रक, दिनांक 13 ऑगस्ट, 2014

(3) शासन परिपत्रक, दिनांक 16 मार्च, 1999

(4) शासन परिपत्रक, दिनांक 25 मार्च, 2013

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

87. शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीची कार्यपद्धत खालीलपैकी कोणत्या शासन निर्णयाद्वारे नव्याने निश्चित करण्यात आली आहे ?

(1) शासन निर्णय दिनांक 02 जानेवारी, 1992

(2) शासन निर्णय दिनांक 30 ऑक्टोबर, 2015

(3) शासन निर्णय दिनांक 30 नोव्हेंबर, 2015

(4) शासन निर्णय दिनांक 31 डिसेंबर, 2015

---

88. माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांना शासन सेवेतील गट अ व गट ब संवर्गातील प्रवेशासाठी खालीलप्रमाणे कोणती सवलत देय आहे ?

(1) वयोमर्यादेमधे सेवेचा कालावधी अधिक तीन वर्षे सवलत

(2) वयोमर्यादेत फक्त 5 वर्षांची सवलत

(3) शैक्षणिक अर्हतेत सवलत

(4) फक्त परीक्षा शुल्कामधे सवलत

---

89. आयोगाच्या कार्यालयातील गट अ संवर्गातील अधिकाऱ्यांना रजा, निवृत्तीवेतन व उपदान मंजूर करणारा प्राधिकारी कोण आहे ?

(1) मुख्य सचिव (2) आयोगाचे सचिव

(3) संपूर्ण आयोग (4) अध्यक्ष

---

90. विकलांग व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणाचा अथवा विकलांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेतील सवलतीचा फायदा घेऊ इच्छीणाऱ्या उमेदवारांनी खालीलपैकी कोणत्या पद्धतीने निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे ?

(1) वैधकीय मंडळाने प्रदान केलेले

(2) SADM प्रणालीद्वारे निर्गमित प्रमाणपत्र

(3) सेवार्थ प्रणालीद्वारे निर्गमित प्रमाणपत्र

(4) आरोग्य संचालकाद्वारे निर्गमित प्रमाणपत्र

91. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची कार्यनियमावली (Rules of Procedure) भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदानुसार प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारान्वये तयार करण्यात आली आहे ?

(1) अनुच्छेद 309
(2) अनुच्छेद 315
(3) अनुच्छेद 320
(4) अनुच्छेद 323

---

92. पोलीस उपनिरीक्षक पदाच्या शारीरिक चाचणीसाठी विज्ञापित पदांच्या किती पट उमेदवार बोलाविण्यात येतात ?

(1) 5 पट
(2) 3 पट
(3) 4 पट
(4) 6 पट

---

93. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (विचारविनिमयापासून सूट) विनियम, 1965 भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदाखालील परंतुकानुसार तयार करण्यात आला आहे ?

(1) अनुच्छेद 318 चा खंड (3)
(2) अनुच्छेद 320 चा खंड (3)
(3) अनुच्छेद 315 चा खंड (3)
(4) अनुच्छेद 316 चा खंड (3)

---

94. शासनाद्वारे आयोगाशी केल्या जाणाऱ्या पत्र व्यवहाराबाबत खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

(1) आयोगाशी केला जाणारा पत्र व्यवहार सौजन्यपूर्वक भाषेत करावा.
(2) आयोगाशी केला जाणारा पत्र व्यवहार सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने करावा.
(3) आयोगाशी केला जाणारा पत्र व्यवहार आयोगाच्या सचिवांना अग्रेषित केलेला असावा.
(4) वरील सर्व

---

95. आयोगामार्फत आयोजित मुलाखतीच्या वेळी आयोगाला सहाय्य करण्यास नियुक्त करण्यात येणारा शासन प्रतिनिधी खालीलपैकी किमान कोणत्या दर्जाचा असणे आवश्यक आहे ?

(1) सहसचिव
(2) सचिव
(3) प्रधान सचिव
(4) उपसचिव

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**96.** पोलीस उपनिरीक्षक पदावरील भरतीसाठी मागासवर्गीय उमेदवारांना वयामध्ये खालीलपैकी कोणती सवलत देय ठरते ?

(1) 1 वर्ष (2) 3 वर्ष

(3) 5 वर्ष (4) 4 वर्ष

---

**97.** जाहिरातीमध्ये वयोमर्यादेची गणना खालीलपैकी कोणत्या नियमानुसार केली जाते ?

(1) मुंबई नागरी सेवा (वर्गीकरण आणि सेवाभरती) नियम, 1939

(2) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, 1981

(3) महाराष्ट्र नागरी सेवा (नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी उच्च वयोमर्यादेची तरतूद) नियम, 1986

(4) स्थायी आदेश

---

**98.** सरळ सेवा भरतीसाठी विहीत शैक्षणिक अर्हता व अनुभव यांची गणना कोणत्या दिनांकास केली जाते ?

(1) जाहिरातीत नमूद विशिष्ट दिनांकास

(2) अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास

(3) मुलाखतीच्या दिनांकास

(4) जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकास

---

**99.** आयोगाचा वार्षिक अहवाल राज्यपालांना सादर करण्यापूर्वी त्यास कोणाची मंजूरी घेतली जाते ?

(1) अध्यक्ष

(2) संपूर्ण आयोग

(3) अध्यक्षांनी नियुक्त केलेली समिती

(4) वरीलपैकी एकही नाही

---

**100.** अवरसचिव, उपसचिव व सहसचिव या पदांवर किती कालावधी करिता नियुक्ती करण्याचे अधिकार आयोगाच्या अध्यक्षांना आहेत ?

(1) 1 वर्ष (2) 6 महिने

(3) 3 महिने (4) 11 महिने

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

# सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे.....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न

प्र. क्र. **201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर ''(3) राजा राममोहन रॉय'' असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर ''(3)'' होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक ''③'' हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

SEAL